CNR NO.MHSO060007702025

<u>नियमित दिवाणी दावा क्र.५३/२०२५</u>

अनिल होळकर

**विरुध्द**

शाखा व्यवस्थापक, यशवंतभाऊ पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था

## <u>निशाणी क्र.३३ व १ वरील एकत्रीत आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ तर्फे वादपत्र रद्द (Reject) करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

०२. प्रतिवादीचे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा कर्ज रकमेचा हिशोब ठरवुन मिळणेसाठी तसेच निरंतर ताकीदीसाठी प्रतिवादीविरुध्द दाखल केलेला आहे. वादी हे प्रतिवादी क्र.१ या सहकारी संस्थेकडुन कर्जाच्या रकमेबाबतचा हिशोब मागत आहेत. प्रतिवादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ही नोंदणीकृत सहकारी संस्था आहे. वादीने दावा दाखल करण्याकरिता पूर्व परवानगी घेतलेली नाही. सहकारी संस्थेच्या कर्जाबाबतच्या कोणत्याही वादाविषयी निर्णय देण्याचा अधिकार या न्यायालयास नाही. सदर बाबीची जाणीव असुनही वादीने दावा दाखल केलेला असुन, वादपत्र रद्द करण्यात यावे.

०३. वादीतर्फे म्हणणे मांडण्यात आले की, प्रतिवादी यांनी वादीकडुन बेकायदेशीरपणे वसुली चालु केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांचेकडुन कलम १०१ चा दाखला घेतलेला आहे. त्याप्रमाणे वादी हे व्याजासह रक्कम परत करण्यास तयार असतांना प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी बेकायदेशीर वसुली चालु केल्याने त्यांचे कृत्य रोखण्यासाठी वादीस दावा दाखल करावा लागला आहे. या अर्जासोबत प्रतिवादीने प्रतिज्ञापत्र दिलेले नाही. प्रतिवादीस अर्ज दाखल करण्याचा

अधिकार नाही. बेकायदेशीर पध्दतीने चाललेल्या प्रक्रियेला थांबविण्याचा व अशा दाव्यात आदेश करण्याचा या न्यायालयास अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

०४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ असून, त्यावरील निष्कर्ष मी त्याखाली नोंदविलेल्या कारणांसाठी देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम १६३ नुसार दावा या न्यायालयात चालण्यास बाधा येते काय ? व त्यामुळे वादपत्र नामंजूर/रद्द होण्यास पात्र आहे काय ? | .... | **होकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | .... | **अंतिम आदेशानुसार** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता –**

०५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादीने वादपत्रातील कथनांचा पुनरुच्चार युक्तिवादात केला. तसेच वादीने दाखल केलेले न्यायनिर्णय विचारात घेण्यात आले. वादीने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***महाराष्ट्र शासन वि. बाबुलाल आणि इतर, (एआयआर १९६७ सुप्रिम कोर्ट १३५३),*** या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. न्यायनिर्णय वाचला. त्यातील बाबी व या प्रकरणातील बाबी भिन्न असल्याने सदरील न्यायनिर्णय वादीस उपयोगी पडत नाही. वादीने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***डेक्कन मर्चंट को–ऑपरेटीव्ह बँक लि. वि. मे. डालीचंद जैन आणि इतर, (एआयआर १९६९ सुप्रिम कोर्ट १३२०)***

या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. न्यायनिर्णय विचारात घेण्यात आला. वादीने संस्थेविरुध्द दावा दाखल केलेला आहे. सबब, त्या न्यायनिर्णयाच्या प्रकरणातील बाबी पाहता त्यातील निष्कर्ष वादीस या दाव्यात उपयोगी पडत नाहीत. वादीतर्फे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***मे. हिरालाल रतन लाल वि. सेल्स टॅक्स ऑफीसर, सेक्शन ३, कानपुर आणि इतर, (एआयआर १९७३ सुप्रिम कोर्ट १०३४)*** या न्यायनिर्णयाचा आधार घेण्यात आला. त्यातील बाबी व या दाव्यातील बाबी भिन्न आहेत. करिता, सदरील न्यायनिर्णय वादीस उपयोगी पडत नाही.

०६. दावा चालविण्याचा या न्यायालयास अधिकार आहे किंवा नाही ? हे वादपत्रातील कथनांवरुन ठरवावे लागेल. प्रतिवादी क्र.१ व ३ हे दाव्यात हजर झालेले असुन, त्यांचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहताना सर्वप्रथम वादीचे कथन की, त्याने प्रतिवादी क्र.१ संस्थेकडुन सन २०१२ साली रक्कम रु.५,००,०००/– कर्ज घेतले होते, ही महत्वाची आहे. दाव्यात एकुण पाच प्रतिवादी आहेत. त्यापैकी प्रतिवादी क्र.४ व ५ हे वादीच्या कर्जास जामीनदार असल्याचे वादीचे कथन आहे. वादीने दाव्यात पुढे असे कथन केले की, प्रतिवादी क्र.४ व ५ हे प्रस्तुत कर्जाचे कामी जामीनदार असल्यामुळे त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील केलेले असुन, त्यांचेविरुध्द वादीस दाद मागणे नाही. म्हणजेच केवळ ज्या पतसंस्थेकडुन कर्ज घेतले व त्यांचे वसुली अधिकारी यांचेविरुध्द तसेच ज्या अधिकाऱ्याने म्हणजेच प्रतिवादी क्र.२ यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १०१ प्रमाणे दाखला दिला होता त्यांचेविरुध्द दाव्यात मागणीप्रमाणे हुकूम मिळण्याची वादीची विनंती आहे. या अनुषंगाने दाव्यातील वादीची विनंती देखील पाहणे आवश्यक आहे.

०७. वादीने दाव्यातील परिच्छेद क्र.९ मध्ये खालील मागणी केलेली आहे.

*'' (अ) प्रतिवादीने वादीचे कर्ज प्रकरणी सर्व कागदपत्रांच्या नकला वादीस देवुन*

*योग्य व वाजवी कायदेशिर दराने व्याजाची आकारणी करुन येणे–देणे रकमेचा हिशोब करुन येणे देणे निश्चित करणे बाबत हुकूमनामा व्हावा.*

*(ब) वर कलम अ मधील मागणी प्रमाणे हुकूम होवुनही प्रतिवादींनी हुकूमाप्रमाणे हिशोब न दिल्यास कोर्टामार्फत सनदी लेखापाल अथवा अन्य कोणत्याही तज्ञ व्यक्तीची नेमणुक करुन हिशोब करुन मिळणेबाबत हुकूम व्हावा.*

*(क) प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांनी दिलेल्या वसुली दाखल्याच्या बाहेर जावुन बेकायदेशिरपणे वादी यांचेकडुन वसुल करणेसाठी वादीची जंगम व स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावु नये अशी निरंतरची ताकिद प्रतिवादी क्र.१ व ३ यांचेविरुध्द देणेत यावी ही विनंती.*

*(ड) या दाव्याचा संपूर्ण खर्च वादीस प्रतिवादी यांचेकडुन वसुल होवुन मिळावा.*

*(इ) कारण परत्वे दावा दुरुस्तीस परवानगी असावी.*

*(ई) इतर योग्य ते न्यायाचे हुकूम या वादीचे बाजुने व्हावेत.''*

०८. वादीची मागणी पाहता सर्वप्रथम अशा प्रकारचा दावा न्यायालयात दाखल करता येवु शकतो का ? हा प्रश्न उपस्थित होतो. ज्याअर्थी, वादीने प्रतिवादी क्र.१ कडुन कर्ज घेतल्याची बाब मान्य केली आहे व त्याचे वसुलीकरिता प्रतिवादी क्र.२ यांनी कलम १०१ चा दाखला दिला आहे त्याअर्थी, अशा परिस्थितीत खात्याचा तपशिल मागण्याचा/हिशोब सादर करण्याचा दावा करता येवु शकत नाही (Suit for rendition of accounts) असे या न्यायालयाचे मत आहे. तरी देखील वादीने दावा दाखल केलेला आहे व याचे कारण पाहणे आवश्यक ठरते.

०९. वादीने दाव्यात कथन केले की, रु.५,००,०००/– कर्ज त्याने प्रतिवादी क्र.१ संस्थेकडुन घेतले होते. वेळेत त्याची परतफेड तो करु शकला नाही. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ यांचेकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १०१ प्रमाणे

वसुली दावा/अर्ज दाखल केला होता. त्याची नोटीस वादीस आली नव्हती व नाही. सदरील अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ संस्थेने व्याजाची चुकीची आकारणी केली. त्याद्वारे अवास्तव तसेच अवाजवी रकमेची मागणी प्रतिवादी क्र.१ ने वादीकडे केली. तसेच प्रतिवादी क्र.३ यांचेमार्फत वादीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १५६ व नियम १०७ प्रमाणे नोटीस पाठविली. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ यांचा प्रतिवादी क्र.२ यांच्याकडे दिलेला अर्ज बेकायदेशीर आहे.

१०. वादीने दाव्यात कथन केले की, बेकायदेशीर वसुली दाखल्याच्या आधारे स्थावर व जंगम जप्ती करण्यासाठी प्रतिवादी क्र.३ यांनी दि.०६.०६.२०२५ रोजी दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रात जाहीर लिलावाची नोटीस दिली होती. वादीचे कथन आहे की, त्यांनी दि.०१.०४.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द प्रतिवादी क्र.२ यांचेकडे तक्रारी अर्ज दिला होता. तसेच प्रतिवादी क्र.२ यांनी दिलेल्या कलम १०१ नुसार वसुली दाखल्याच्या अनुषंगाने नियमानुसार होणारी रक्कम व्याजासह भरण्यास तयार असल्याचे व सदरील रक्कम भरुन घेवुन लिलावाची बेकायदेशीर कार्यवाही करु नये असा अर्ज दिला. तरी देखील त्यांच्या पत्राची दखल प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी घेतली नाही. त्यानंतर वादीने प्रतिवादी क्र.१ व २ यांना वकीलांमार्फत नोटीस पाठवुन हिशोब मागणी केली. त्यास बेकायदेशीर उत्तर प्रतिवादींनी दिले.

११. वादीने दाव्यात कथन केले की, दि.२५.०६.२०२५ रोजी पर्यंतचे व्याज व रक्कम अशी रु.१६,६५,३२२/- भरुन घेवुन कार्यवाही बंद करणेबाबत आदेश करण्यात यावा असा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२ यांचेकडे दिला. तथापि, प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना दाद दिली नाही. तसेच त्यांचा हिशोब रु.३२,०७,०६६/- इतका असुन, तेवढी रक्कम भरल्यास लिलावाची रक्कम थांबविण्यास तयार असल्याचे कथन केले. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी दिलेल्या दाखल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांचेसमक्ष रक्कम भरण्यास तयार असल्याचे

कळवुनही प्रतिवादी क्र.२ यांनी बेकायदेशीर हिशोबाची रक्कम वसुलीची प्रक्रिया चालु केल्याने प्रस्तुतचा दावा वादीने दाखल केलेला आहे.

१२. वादीच्या कथनाच्या अनुषंगाने दाखल कागदपत्र विचारात घेण्यात आले. दि.२५.०६.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.२ यांच्याकडे तक्रारी अर्ज दिल्याबाबत दस्त वादीने निशाणी क्र.४ वरील अनुक्रमांक ५ नुसार दाखल केलेला आहे. तसेच दि.११.०९.२०२४ रोजी वादीने जिल्हा निबंधक यांच्याकडे केलेल्या तक्रारी अर्जाची प्रत अनुक्रमांक ७ नुसार दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना पाठविलेल्या दि.२५.०६.२०२५ रोजीच्या पत्राची प्रत अनुक्रमांक ८ वर वादीने दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र.३ यांनी जिल्हा उपनिबंधक यांना दि.२६.०६.२०२४ रोजी पत्र पाठवुन अपसेट प्राईज मंजूर होणेबाबत विनंती केली.

१३. उपरोक्त वादीची कथने पाहता हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.१ यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १०१ प्रमाणे वसुली दाखला सन २०१३ साली प्राप्त केला होता. त्या अनुषंगाने सन २०१४ सालात वादीची मिळकत जप्त करण्यात आली व त्यानंतर कलम १५६ व नियम १०७ (५) (अ) प्रमाणे कार्यवाही केली जात आहे. यापूर्वी सन २०२२ मध्ये देखील जप्तीच्या अनुषंगाने कार्यवाही प्रतिवादी क्र.१ व ३ यांचेमार्फत करण्यात येत होती असे वादीने दाखल केलेल्या अनुकमांक ९ वरील दस्तासोबत असलेल्या इतर दस्तावरुन स्पष्ट होते.

१४. वादींना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १५४ खाली पुनर्निरिक्षण/पुनःसमीक्षा अर्ज दाखल करण्याची संधी उपलब्ध होती. कलम १०१ चा दाखला सन २०१३ साली प्राप्त झाल्यानंतर सन २०१३–१४ सालात वादीची स्थावर मिळकत जप्तीची कार्यवाही करण्यात येत होती असे दाखल कागदपत्रावरुन दिसते. तरी देखील वादीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १५४ प्रमाणे अथवा त्या

कायद्यातील इतर तरतूदीप्रमाणे वरिष्ठांकडे प्रतिवादी क्र.२ यांचा आदेश आव्हानित केला नाही. या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १६३ पाहणे आवश्यक ठरते. कलम १६३ पुढीलप्रमाणे आहे.

*''**१६३. न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंधः** (१) या अधिनियमात स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याखेरीज कोणत्याही दिवाणी किंवा महसूल न्यायालयास पुढील बाबतीत कोणतीही अधिकारिता असणार नाही, -*

*(अ) ........*

*(ब) ........*

*(क) ........*

*(२) ........*

*(३) हा अधिनियम किंवा नियम यानुसार देण्यात आलेले सर्व आदेश, निर्णय किंवा निवाडे हे या अधिनियमातील अपील किंवा पुनरीक्षण याविषयीच्या तरतुदींच्या अधीनतेने अंतिम असतील आणि गुणावगुणावरुन किंवा कोणत्याही इतर कारणावरुन असा कोणताही आदेश, निर्णय किंवा निवाडा, त्यावर, कोणत्याही न्यायालयास हरकत घ्यावयास, तो रद्द करावयास, त्यात फेरबदल करावयास, त्याची फेरतपासणी करावयास किंवा तो निरर्थक ठरविला जाण्यास पात्र असणार नाही.''*

१५. उपरोक्त तरतुद पाहता हे स्पष्ट होते की, त्यातील उपकलम ३ नुसार अशाप्रकारे आदेश न्यायालयात आव्हानित केला जावु शकत नाही. वादीने सदरील कार्यवाही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम तरतूदी अंतर्गत प्रतिवादी क्र.२ यांचे वरिष्ठांकडे अथवा सक्षम प्राधिकरणाकडे आव्हानित करणे आवश्यक असताना देखील हिशोब सादर करण्याचा दावा दाखल केलेला आहे, जो की, वादी हा प्रतिवादी क्र.१ संस्थेचा कर्जदार आहे ही बाब पाहता कायदेशीर ठरत नाही. या निष्कर्षास आणखी कारण म्हणजे वादी व प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१६ दि.०४.०७.२०२५ रोजी दिलेला अर्ज हे देखील होय.

१६. दि. ०४.०७.२०२५ रोजी वादी व प्रतिवादी यांचेतर्फे अर्ज (निशाणी क्र.१६) दाखल करण्यात आला. त्यामध्ये वादी व प्रतिवादीतर्फे नमुद करण्यात आले की, वादीने प्रतिवादीस कर्जाचेकामी रु.२७,००,०००/– देण्याचे आहेत. ते कशाप्रकारे द्यावयाचे आहेत याबाबत देखील तपशिल सदरील अर्जात नमुद आहे. तसेच त्यात असे देखील नमुद करण्यात आले होते की, शेवटचा हप्ता दिल्यानंतर वादी यांचे मिळकतीवरील बोजा कमी करण्याचे पत्र देण्याचे आहे. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे देण्यात आलेला सदरील अर्ज (निशाणी क्र.१६) पाहता आता दाव्यामध्ये वादीस आणखी काही हिशोब प्रतिवादी क्र.१ यांनी द्यावा असे राहिलेले नाही. या ही कारणास्तव दावा चालू शकत नाही.

१७. उपरोक्त विवेचन व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, कलम १६३ उपकलम ३ व १५४ ची तरतूद पाहता सदरील कलमाची बाधा दावा/वादपत्रास येते या निष्कर्षाप्रत येवुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीता –**

१८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) प्रमाणे वादपत्रातील कथनांवरुन दावा हा कोणत्याही कायद्यान्वये चालविण्यास बाधीत होत असेल तर अशा परिस्थितीत वादपत्र नामंजूर/खारीज होण्यास पात्र ठरते. वादी व प्रतिवादी यांचा अर्ज (निशाणी क्र.१६) पाहता तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाचे कलम १६३ उपकलम ३ व कलम १५४ नुसार या न्यायालयास अशाप्रकारचा दावा चालविण्यास प्रतिबंध असल्याने, वादपत्र रद्द होण्यास पात्र ठरते. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.  वादपत्र खारीज करण्यात येते.

३.  येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात घोषीत.)

NILESH SUBHASH BUDRUK Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK Date: 2026.04.29 17:29:31 +0530

दि. २९.०४.२०२६                    ( नीलेश सु. बुद्रुक )

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

पंढरपूर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 29.04.2026 |
| (d) | Uploaded on | : | 29.04.2026 |